# पोलीस आयुक्तालय

## मिरा-भाईंदर,वसई-विरार

राष्ट्रसंत आचार्य श्री पदमसागर सुरश्वरजी भवन,
सेक्टर-०५, रामनगर शांती गार्डन मिरारोड पुर्व ठाणे ४०११०७
फोन नंबर ०२२-२९४५१००१


जा. क्र./पोआ मिभावવि/ मनाई आदेश/२०२५ - 23609 दिनांक :-०६/०३/२०२५

**<u>भारतीय नागरिक सुरक्षा संहिता चे कलम १६३ (१) (२) अन्वये आदेश</u>**

मनाई आदेश :-

ज्याअर्थी, हे निदर्शनास आलेले आहे की, अनेक परदेशी नागरिक हे मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयात येतात आणि आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये खालील नमुद केलेल्या विविध आस्थापनांमध्ये वास्तव्य करतात.

ज्याअर्थी, हे निदर्शनास आलेले आहे की, यामुळे असामाजिक तत्वांना मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत त्यांची ओळख आणि उपस्थिती लपवुन राहण्याची संधी प्राप्त होते.

त्याअर्थी, **मी प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ मिरारोड, अतिरिक्त कार्यभार पोलीस उप-आयुक्त मुख्यालय व एफ.आर.ओ., मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय,** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता चे कलम १६३ (१),(२) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन आदेश देतो की, खालील नमुद आस्थापनांचे मालक/चालक/व्यवस्थापक हे त्यांच्या आवारात परदेशी नागरिकांचे आगमन झाल्यापासुन २४ तासांच्या आत पोलीसांना माहिती देतील.

१) बोर्डिंग हाऊस

२) क्लब

३) विश्रामगृहे (खासगी कंपनीचे विश्रामगृहांसह)

४) पेयींग गेस्ट-हाऊस

५) भाडेतत्वावर मिळणारी निवासस्थाने/घरे/सदनिका/बंगले/चाळ इ.

६) रुग्णालये/दवाखाने

७) व्यावसायिक होम-स्टे सुविधा (ज्या ठिकाणी परकीय नागरिकांना आर्थिक किंवा exchange-क्रेडिट यांच्या मोबदल्यात निवास व्यवस्था उपलब्ध केली जाते)

८) दुकाने/उपहारगृहे

९) सराई आणि

१०) जहाज/बोटी

वास्तव्यास येणा-या परदेशी नागरीकांची माहिती या आदेशासोबत जोडलेल्या प्रारुपा नजीकच्या पोलीस ठाण्यास देण्यात यावी.

तसेच आदेशीत करण्यात येते की, अशा प्रकारच्या आस्थापणांचे मालक/चालक/व्यवस्थापक यांनी त्यांच्याकडे सद्यस्थितीला त्यांच्या आवारात वास्तव्यात असणाऱ्या परदेशी नागरीकांची माहिती सदरचा आदेश पारीत झाल्यापासुन २४ तासाच्या आत नजीकच्या पोलीस ठाणे यांना सादर करावी.

जो कोणी सदर आदेशाचे उल्लंघन करेल तो इसम भारतीय न्याय संहिता २०२३ कलम २२३ प्रमाणे व इतर संबंधित कायदयांप्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे सदरचा आदेश सार्वजनिक ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये सदर आदेशाच्या प्रति स्थानिक वृत्तपत्रातुन प्रसिध्द कराव्यात. आदेशामुळे प्रभावित होणा-या प्रत्येक व्यक्तीस आदेशापुर्वी नोटीस बजावणे शक्य नसल्याने सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदरचा आदेश कालावधी हा **दिनांक ०७/०३/२०२५ रोजीचे ००.०१ ते दिनांक ०४/०५/२०२५ रोजीचे २४.०० वा पर्यंत** लागू राहील.

सदरचा आदेश आज दिनांक ०६/०३/२०२५ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला आहे.

पोलीस आयुक्त
मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
सत्यमेव जयते

**( प्रकाश गायकवाड )**
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०१
अति.कार्य.पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय व एफआरओ
मिरा-भाईंदर,वसई-विरार.

<u>सहपत्र</u> :-

परदेशी नागरिकांची माहिती सादर करण्याचा नमुना.

<u>प्रत:-</u>

१) अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) जिल्हाप्रसिध्दी अधिकारी, ठाणे व पालघर यांना बातमी म्हणुन प्रसिध्दीसाठी.
४) पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, २, व ३ माहिती व कार्यवाही बाबत.
५) सर्व सहायक पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.
६) सर्व पोलीस ठाणे, प्रभारी अधिकारी, मि.भा.व.वि.
७) व्यवस्थापक, शासकिय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांचेकडे पुढील प्रसिध्द होणा-या राजपत्रात प्रसिध्दीसाठी.
८) नस्तीकरिता.